भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र.४०१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २१/०५/२०१७

**१) महिला जंगल शिवारात मृत अवस्थेत मिळुन आली . :-**

दिनांक २०/०५/२०१७ चे ०००५ ते १६.०० वा. दर. यातील मृतक श्रीमती हिरन फत्तु शेंडे वय ५५ वर्ष, ही फिर्यादी सुने सोबत येरली जंगंलात तेंदु पत्ता तोडण्या करीता गेली असता फिर्यादीने मृतक हीला घरी जाण्यास सांगुन पुढे निघुन गेली घरी परत आल्यावर फिर्यादीस मृतक ही घरी न दिसल्याने तिचा गावात व जंगलातील परीसरात शोध घेतला असता मृतक सासु ही मृत अवस्थेत येरली जंगल शिवारात दिसुन आल्याने तिला घरी घेवुन आली व पो.स्टे. ला माहिती दिल्याने मृतक चे प्रेत सु. बो. दवाखाना तुमसर येथे घेवुन गेल्याने फिर्यादी सौ. अंजीरा देवराम शेंडे वय २९ वर्ष रा. येरली यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पो.स्टे तुमसर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कळंबे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**२) ट्रॅक्टरची ट्रॉली डोक्यावर पडुन गंभिर दुखापत होवुन औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु . :-**

दिनांक १९/०५/२०१७ चे १७.०० वा. दर. यातील मृतक कृपाकर शिवाजी मेश्राम वय २३ वर्ष, रा. मुजबी हा त्याचे ट्रॅक्टर क्रमाक एमएच ३६/एल ३१५७ क्र. चे ट्रॉली मध्ये बोरीच्या काळया हायड्रोलीक ट्रॉलीने खाली करुन त्यास ट्रॉली खाली पडली नाही म्हणुन पाहण्यास गेला असता ट्रॅक्टरची ट्रॉली डोक्यावर पडुन गंभिर दुखापत होवुन जखमी झाल्याने त्यास ग्रा.रु. पवनी येथे औषधोपचारा करीता भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने फिर्यादी सुर्यभान कवडु गाते वय ४५ वर्ष, कोंरभी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पो.स्टे पवनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. गदादे पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**३) चक्कर येवुन खाली पडल्याने औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु . :-**

दिनांक २०/०५/२०१७ चे १२.३० वा. दर. यातील मृतक भावुदास दामाजी मौजे वय ४८ वर्ष, रा. खोकरला हा दिनांक २०/०५/२०१७ ला १०.३० वा. दरम्यान चक्कर येवुन खाली पडल्याने त्यास औषधोपचारा करिता सा. रु. भंडारा येथे भरती केले असता दिनांक २०/०५/२०१७ चे १२.३० वा. उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉक्टरी मेमो वरुन पो.स्टे भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. फुंडे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**४) नायलॉन दोरीने गळफास लावुन इसमाचा मृत्यु . :-**

दिनांक १९+२०/०५/२०१७ चे ०८.०० वा. दर. यातील फिर्यादीचा पुतण्या मृतक विनय सिध्दार्थ शामकुवर वय २७ वर्ष, रा. उज्वल नगर मुरमाडी हा स्वत:चे घरी सिलींग फॅन ला नायलॉन दोरीने गळफास लावुन आत्महत्या केल्याने फिर्यादी मिलींद मुन्शीलाल शामकुवर वय ५६ वर्ष, रा. मुरमाडी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पो.स्टे लाखनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. उईके पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**५) नदीचे पाण्यात बुडुन युवकाचा मृत्यु . :–**

दिनांक १८/०५/२०१७ चे १५.०० ते २०/०५/२०१७ चे .०८.३० वा. दर. यातील मृतक आमिन दिदार चव्हान वय २६ वर्ष, रा. बाबामस्तानशाह वार्ड भंडारा हा घरी काहीही न सांगता घरुन निघुन जावुन वैनगंगा नदीचे पाण्यात कुदुन पाण्यात बुडुन मृतकचे प्रेत मिळुन आल्याने फिर्यादी मोहम्मद सलिम चव्हान वय २६ वर्ष, रा. बाबामस्तानशाह वार्ड भंडारा याचे तोंडी रिपोर्ट वरुन पो.स्टे भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनी. तोडासे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**६) दारुडया वाहन चालकावर कारवाई . :–**

अ) दिनांक २०/०५/२०१७ चे १७.१५ वा. दरम्यान यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील वाहन धोकादायक रित्या दारूचे नशेत वाहन चालवितांनी मिळुन आल्याने वैद्यकीय परीक्षण अहवाला वरून सरतर्फे फिर्यादी पोना. रामटेके यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे. पवनी येथे कलम १८४, १८५ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. रामटेके पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

ब) दिनांक २०/०५/२०१७ चे १९.०० वा. दरम्यान यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील वाहन दारू पिऊन दारुचे नशेत सार्वजनीक आमरोडवर चालवितांनी मिळुन आल्याने वैद्यकीय परीक्षण अहवाला वरून सरतर्फे फिर्यादी पोहवा. कोडवते यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे. पवनी येथे कलम १८५ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कोडवते पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**७) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक २०/०५/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ८४ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी १२ तीन सिटर वाहनांवरती १५ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ५८ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

पोलीस नियत्रंण कक्ष अधीकारी
भंडारा
दुरध्वनी.क्र ७५८८५६३३३५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.